# MSCIT परीक्षेच्यापुर्वी शासन मान्य संस्थांकडील संगणक परीक्षा अर्हतेबाबत......

महाराष्ट्र शासन
सामान्य प्रशासन विभाग
शासन निर्णय क्रमांक मातंसं/नस्ती ०७/प्रक्र ७१ /३९,
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२
दिनांक : २१ फेब्रुवारी, २००८

वाचा १) शासन निर्णय क्रमांक : १०९८/प्रक्र १३४/९८/३९, दिनांक ३ मार्च, १९९९
२) शासन निर्णय क्रमांक : प्रशिक्षण १०००/१४३/३९, दि.१० जुलै, २०००,
३) शासन निर्णय क्रमांक : पशिक्षण २०००/प्र.क्र. ६१/२००१/३९, दिनांक ७ ऑगष्ट,२००१
४) शासन निर्णय क्रमांक : प्रशिक्षण-२०००/प्र.क्र.५/२००१/३९, दिनांक २० जुलै, २००२
५) शासन निर्णय क्रमांक : प्रशिक्षण-२०००/प्र.क्र.५/२००१/३९, दिनांक ३० ऑक्टोबर, २००२
६)शासन निर्णय क्रमांक : प्रशिक्षण/२०००/प्र.क्र.६१/२००१/३९, दिनांक १९ मार्च,२००३
७)शासन निर्णय क्रमांक :मातंस/नस्ती ०४/२२४/३९, दिनांक २६ मे, २००४
८) शासन निर्णय क्रमांक : मातंस/नस्ती ०४/४२०/३९, दिनांक २७ जून, २००५.

**प्रस्तावना :-** संदर्भाधिन अनु. क्र. १ च्या शासन निर्णयाअन्वये शासकीय अधिकारी / कर्मचारी यांना सदर आदेशात नमूद ५ संस्थांच्या संगणक प्रशिक्षण अभ्यासक्रमास मान्यता देण्यात आली होती. अनु. क्र. २ येथील शासन निर्णयान्वये चाचणी परीक्षा (Confirmatory Test) अनिवार्य करण्यात आली होती. तसेच दिनांक ७ ऑगष्ट, २००१ च्या शासन निर्णयाअन्वये D.O.E.A.C.C. या सोसायटीचे C.C.C. किंवा "O"स्तर किंवा "A"स्तर किंवा "B"स्तर किंवा "C" स्तर यापैकी एक परीक्षा उत्तीर्ण झाल्याचे प्रमाणपत्र किंवा महाराष्ट्र राज्य उच्च व तंत्र शिक्षण मंडळ, मुंबई यांचेकडील MS-CIT परीक्षा उत्तीर्ण झाल्याचे प्रमाणपत्र संगणक अर्हता प्रमाणपत्र म्हणून विहित करण्यात आले आहे. संगणक अर्हतेबाबत शासन आता खालील प्रमाणे निर्णय घेत आहे.

***शासन निर्णय :-***

शासन निर्णय क्रमांक प्रशिक्षण-२०००/प्र.क्र.६१/२००१/३९, दि. ७ ऑगस्ट २००१ अन्वये शासकीय अधिकारी / कर्मचारी यांना MS-CIT परीक्षा अनिवार्य करण्यात आलेली आहे. दि. ७ ऑगस्ट २००१ च्या आदेशान्वये MS-CIT परीक्षा अनिवार्य करण्यापुर्वी संदर्भाधिन अनु. क्र. १ च्या दिनांक ३.३.१९९९ च्या शासन निर्णयान्वये (१) यशवंतराव चव्हाण विद्यापीठ, (२) डीओईएसीसी सोसायटी नवी दिल्ली, (३) सीडॅक पुणे, (४) सेंटर फॉर इलेक्ट्रॉनिक्स डिझाईन अँड टेक्नॉलॉजी ऑफ इंडिया, औरंगाबाद व (५) तंत्रशिक्षण मंडळ महाराष्ट्र राज्य, मुंबई अशा एकूण पाच संस्थांकडून त्यांच्या नावासमोर दर्शविलेला संगणक प्रशिक्षण पाठयक्रम विहीत करण्यात आला होता. या शासन निर्णयान्वये MS-CIT परीक्षेपुर्वी म्हणजे दि. ७ ऑगस्ट २००१ पुर्वी ज्या अधिकारी / कर्मचाऱ्यांनी शासनाने विहित केलेली संगणक अर्हता वरील शासन मान्य संस्थांमधुन उत्तीर्ण केली असेल त्यांनी विहित संगणक परीक्षा उत्तीर्ण केली असल्याचे समजण्यात येईल. तथापि उपरोक्त शासन पुरस्कृत संस्थामधुन परीक्षा उत्तीर्ण

जिल्हाधिकारी कार्यालय रत्नागिरी
शाखा:-
आवक नं. ६१४
२४ APR 2008

(P.T.O.

झाल्यामुळे यापुर्वी वेळोवेळी प्रोत्साहनात्मक रक्कम व प्रशिक्षण खर्च म्हणून ज्या रकमा विविध शासन निणर्यान्वये अनुज्ञेय केलेल्या आहेत त्या रकमा अशा अधिकऱ्यांना/कर्मचाऱ्यांना देय रहाणार नाहीत.

२. अनु क्र. ७ येथील दि. २६ मे २००४ च्या आदेशान्वये महाराष्ट्र राज्य तंत्रशिक्षण मंडळाच्या संगणक तंत्रशास्त्र (computer technology) / संगणक अभियांत्रिकी (computer Engg.) / माहिती तंत्रज्ञान (information technology) या विषयाच्या महाराष्ट्र राज्य तंत्रशिक्षण मंडळाच्या पदवी / पदवीका व संगणक उपयोजन (computer application), संगणक उपयोजन पध्दती व पृथःकरण (ADCSSAA) या पदव्युत्तर / प्रगत पदवीका अभ्यासक्रमास मान्यता देण्यात आली आहे. याच अनुषंगाने असे आदेश देण्यात येत आहेत की, यानंतर सर्व शासन मान्य विद्यापीठांतील संगणक तंत्रशास्त्र / संगणक अभियांत्रिकी / माहिती तंत्रज्ञान विषयातील पदवी / पदवीका तसेच संगणक उपयोजन, संगणक उपयोजन पध्दती व पृथःकरण या पदव्युत्तर / प्रगत पदवीका अभ्यासक्रम उत्तीर्ण केलेल्या कर्मचाऱ्यांना विहित संगणक परीक्षा उत्तीर्ण समजण्यात येईल.

३. सदर शासन निर्णय सा.प्र.वि./सेवा उपविभाग तसेच वित्त विभाग अनोपचारीक संदर्भ क्रमांक ५८६/व्यय-४ दिनांक २३-११-२००७ नुसार निर्गमित करण्यात येत आहे. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या वेबसाईटवर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संगणक संकेतांक २००८०२२११८२५१८००१ असा आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने,

(भै. भा. पारखी)
उपसचिव (मा.तं.) महाराष्ट्र शासन

प्रति,

राज्यपाल यांचे सचिव,
मुख्यमंत्री यांचे सचिव,
उपमुख्यमंत्री यांचे सचिव,
सर्व मंत्री / राज्यमंत्री यांचे खाजगी सचिव,
मुख्य सचिव यांचे खाजगी सचिव,
शासनाचे सर्व अपर मुख्य सचिव / प्रधान सचिव / सचिव,
प्रबंधक, उच्च न्यायालय (मूळ शाखा), मुंबई
प्रबंधक, उच्च न्यायालय (अपिल शाखा), मुंबई,
प्रबंधक, लोक आयुक्त व उप लोक आयुक्त यांचे कार्यालय, मुंबई,
सचिव, महाराष्ट्र लोकसेवा आयोग, मुंबई,
सचिव, महाराष्ट्र विधान मंडळ सचिवालय, मुंबई,
महालेखापाल-१ (लेखा व अनुज्ञेयता) महाराष्ट्र-१, मुंबई,
महालेखापाल-२ (लेखा व अनुज्ञेयता) महाराष्ट्र, नागपूर,
महालेखापाल-१ (लेखा परीक्षा) महाराष्ट्र-१, मुंबई,
महालेखापाल-२ (लेखा परीक्षा) महाराष्ट्र, नागपूर,
अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई / वांद्रे (पूर्व), मुंबई,
निवासी लेखा परीक्षा अधिकारी, मुंबई,
पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई,
सर्व पोलीस आयुक्त,
सर्व विभागीय आयुक्त,
सर्व महानगरपालिकांचे आयुक्त,
सर्व जिल्हाधिकारी,
सर्व जिल्हा परिषद / नगरपालिकांचे मुख्य कार्यकारी अधिकारी,
सर्व नगरपरिषदांचे मुख्याधिकारी,
व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र ज्ञान महामंडळ मर्यादित, पहिला मजला, व्यवसाय शिक्षण प्रशिक्षण इमारत,
सर्व मंत्रालयीन विभाग,
सचिव, महाराष्ट्र राज्य तंत्रशिक्षण मंडळ, मुंबई,
मंत्रालयीन विभागांच्या नियंत्रणाखालील सर्व विभाग प्रमुख व कार्यालय प्रमुख,
सामान्य प्रशासन विभागातील सर्व कार्यासने,
निवड नस्ती (२ प्रती).



keep with SO file